ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A N.C.R.B.

I.I.F.-I 06

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1\. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्रवि पहिली खबर क्र. FIR No. 24 वर्ष Year 2018 दिनांक Date 02/06/18

2\. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधिनियम-1988 कलमे Sections 7, 13(1)(D) सह 13(2)

(ii) अधिनियम Act — कलमे Sections —

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —

3\. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ................ तारीख पासून Date from 14/5/18 वेळ Time ................ तारीख पर्यंत Date to अद्यापपावेतो वेळ Time ..........

3\. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date 01/06/18 वेळ Time ..................

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 2/2070 तारीख Date 02/06/18 वेळ Time 08.70वा

4\. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5\. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........................ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........................
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name वस्तू व सेवा कर कार्यालय, दुसरा मजला, 'बी' विंग, विक्रीकर भवन, ठिकाणाचे नंबर No. if any बांद्रा-कुर्ला गल्ली Ward कॉम्प्लेक्स, रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place बांद्रा (पु), मुंबई गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6\. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name धर्मेश सोलंकी (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name कांतीभाई सोलंकी

(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age 44 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion हिन्दू जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward प्लॉट नं. 425, डी/45, राजवैभव सोसायटी, हरयाना भवनचे बाजूला, सेक्टर-4, घर/नाव नंबर House/Name No. ........ फोन/मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ ओटर्स नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place चारकोप, कांदिवली (प), मुंबई नं. 400067, गाव Village ........ पोस्ट Post ........ पो.स्टे P. Stn. ........
तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7\. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

देवराम शिवराम पाटील, वय 54 वर्षे (राज्य कर सहाय्यक विक्रीकर आयुक्त) रा.ठि. A/404, रामेश्वर टॉवर, न्यू गोल्डन नेस्ट, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे.

यातील फिर्यादी श्री. धर्मेश कांतीभाई सोळंकी, वय ४४ वर्षे यांचा फिर्यादी जबाब स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आला असून, तीच सदर गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

धर्मेश के. सोळंकी

समक्ष,

Pawar

(स्नेहल पवार)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी अटक आरोपी लोकसेवक याने फिर्यादी यांचे 'लुक आउट' सलून शॉपचे कर्मचाऱ्यांचे सन-2006 पासून आजपर्यंत प्रोफेशनल टॅक्स भरणे बाकी असलेले रु. 2,40,000/- न भरता सन-2014 ते सन-2018 या कालावधीचा टॅक्स रु. 14,650/- भरून उर्वरीत रक्कम भरावी लागू नये याकरीता रु. 50,000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. 45,000/- लाचेची रक्कम कायदेशीर परिश्रमाखेरीज स्विकारली, म्हणून गुन्हा नोंद.

..........

13. **केलेली कार्यवाही** .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ..........

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P. S. .......... District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name स्नेहल पवार
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Coding No. of I. O. ..........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

<u>फिर्यादी जबाब</u> दिनांक ०२/०६/२०१८

मी, धर्मेश कांतीभाई सोलंकी, हिं. वय/४४, धंदा– व्यवसाय, लुकआऊट युनिसेक्स सलुन, शॉप नं. ९, शुभकामना बिल्डींग, महावीर नगर, कांदिवली (प) मुंबई. रा.ठि. प्लॉट नं. ४२५, रू. नं. डी–४५, राजवैभव सोसायटी, हरियाणा भवनजवळ, सेक्टर नं. ४, चारकोप, कांदिवली (प) मोबा. क्र. ९८२०९९१००८

---

मी, वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर सन २०११ पासुन माझे कुटूंबासह रहावयास आहे. माझा लुकआऊट युनिसेक्स सलुनचा व्यवसाय शॉप नं. ९, शुभकामना बिल्डींग, महावीर नगर, कांदिवली (प) मुंबई येथे भाडे तत्वावर सलुन चालवितो. सन २००६ पासुन मी नमुद सलुन फॅमिली या नावाने चालवित होतो. त्यानंतर मी गेल्या १ वर्षापासुन सदरचे सलुन हे लुकआऊट युनिसेक्स नावाने सलुन म्हणुन चालवित आहे.

दिनांक १४/०५/२०१८ रोजी सेलटॅक्स विभागाच्या महिला अधिकारी सौ रिना विचारे, सेल्स टॅक्स निरीक्षक या माझ्या लुकआऊट युनिसेक्स सलुनमध्ये आल्या होत्या. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे दुकानाचे कागदपत्रांची मागणी केली. त्यावर मी त्यांना माझ्या दुकानाच्या संदर्भातील गुमास्ता लायसन्स व इतर आवश्यक कागदपत्रे दाखविले. त्यांनतर सदर महिला अधिकारी यांनी दुकानाचे गुमास्ता लायसन्स पाहुन मला तुमच्या दुकानाचा सन २००६ पासुन प्रोफेशनल टॅक्स बाकी असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना माझा प्रोफेशनल टॅक्स वेळेवर भरतो. तेव्हा सदर महिला अधिकारी यांनी मला माझ्या सलुनमधील कामगारांचे सुध्दा प्रोफेशनल टॅक्स भरावा लागेल असे सांगितले असता त्यांना मी सदरचे टॅक्स भरण्यास तयार असल्याचे सांगितले. नमुद वेळी सदर महिला अधिकारी यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री डी. एस. पाटील (सहा. विक्रीकर आयुक्त) यांच्यासोबत त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधुन नमुद घटनेची माहिती दिली. त्यानंतर नमुद महिला अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे मला नोटीसची प्रत देऊन मला त्यांच्या साहेबांची भेट घेण्यास सांगुन निघुन गेल्या.

त्यानंतर मी माझे सी. ए. श्री विपुल दर्जी यांना श्री पाटील यांची भेट घेण्याकरीता बांद्रा येथील वस्तु व सेवाकर भवन, 'ब' इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील सेल्स टॅक्स कार्यालयात पाठविले. त्यावेळी श्री पाटील यांनी माझ्या सी.ए. ना माझ्या सलुनमधील काम करीत असलेल्या कर्मचारी वर्गाचे रू.२,४०,०००/– इतका प्रोफेशनल टॅक्स भरावयाचा असल्याचे सांगितले. तसेच श्री पाटील यांनी जर तुमच्या अशिलाला सदरची रक्कम भरावयाची नसल्यास मला १ लाख रूपये दिल्यास मी सन २०१४ ते २०१८ या ४ वर्षाचा रू.१४,६५०/– इतकी टॅक्सची पे ऑर्डर काढुन देतो असे सांगितले. त्यावेळी माझ्या सी.ए. ने मला श्री पाटील यांच्या केबिनमधुनच माझ्या मोबाईलवर संपर्क साधुन मला सदरची माहिती दिली. त्यावेळी मी माझ्या सी.ए.ला मी श्री पाटील साहेब यांची त्यांच्या कार्यालयात जावुन प्रत्यक्ष भेट घेतो असे सांगितले.

सदरवेळी श्री. पाटील साहेब यांनी माझ्या सी.ए. कडुन माझा मोबाईल नंबर घेतला. श्री पाटील साहेब यांनी मला त्यांचा मोबाईल क्र. ८७७९७६६५७५ यावरून माझा मोबाईल क्र. ९८२०९९१००८ वर संपर्क करून सदरची केस संपवायची असेल तर त्यांची लवकरात लवकर भेटायला या नाहितर मी पे ऑर्डर काढतो असे सांगितले.

धर्मेश.कां. सोलंकी

श्री धर्मेश कांतीभाई सोलंकी यांची दि. ०२/०६/२०१८ रोजीची फिर्यादी जबाब पुढे चालु.

मी माझ्या कामामध्ये व्यस्त असल्याने दोन तीन दिवसात त्यांना येवुन भेटतो असे सांगितले. दिनांक ३०/०५/२०१८ रोजी श्री पाटील यांनी मला माझ्या मोबाईलवर संपर्क साधुन मला पुन्हा माझे कामाबाबत व लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता रुपये १ लाख देण्यास मला जमणार नाही असे त्यांना सांगितले. त्यावर श्री पाटील साहेब यांनी माझ्याकडे तडजोडी अंती रू.५०,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी केली.

श्री पाटील साहेब हे प्रोफेशनल टॅक्स कमी करण्याकरीता माझ्याकडे रू.५०,०००/— लाचेची मागणी करीत होते. मला श्री. पाटील साहेब यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.०१/०६/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून माझी लेखी तक्रार पो. नि. पवार यांचेकडे दिली.

सदरची तक्रार दिल्यानंतर पो.नि. पवार यांनी माझी ओळख स.पो.आ सतिश चिंचकर (पर्यवेक्षण अधिकारी) व पोलीस पथक यांच्याशी करून दिली. त्यावेळी पो.नि. पवार यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मी सापळा कारवाई करण्यास संमती दिल्यानंतर पो.नि. पवार यांनी माझा परिचय श्री. राजेश येडेकर, लिपिक टंकलेखक व श्री प्रफुलकुमार जोधंळे, लिपिक टंकलेखक, परिवहन आयुक्त कार्यालय, बांद्रा, मुंबई यांच्याशी करून देऊन ते नमुद पडताळणी दरम्यान पंच म्हणुन काम करणार असल्याची माहिती दिली. तसेच पो.नि. पवार यांनी दोन्ही पंचाना व पोलीस पथकास माझी ओळख करून दिली. पो.नि. पवार यांनी माझ्याकडे एक लोकसेवक लाच मागत असल्याबाबत हिंदी भाषेतुन लिहिलेला तक्रार अर्ज दिल्याची माहिती पंचाना सांगुन, सदर तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक लाच मागतात किंवा कसे? याबाबत खात्री करुन सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. पवार यांनी माझ्यासह दोन्ही पंचाना घेऊन गोपनीय कक्षात आलो. तेथे पो.नि. पवार यांनी आम्हाला डिजीटल व्हाईस रेकॉर्डरची माहिती देऊन आमचे वक्तव्य त्यामध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर आम्ही सर्वजण पो.नि. पवार यांच्या कक्षात आलो व आम्हाला पडताळणीबाबत योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पो. नि. पवार यांनी आवश्यक ते सर्व साहित्य घेवून मी, स.पो.आ.चिंचकर, पो.नि.पवार, पो.नि. पाठारे, दोन्ही पंच व पोलीस पथकासह कार्यालयाच्या बाहेर आलो. तेथे दोन शासकिय पोलीस वाहने उभी होती. सदर पोलीस वाहनामध्ये पोलीस पथक, पंच व मी असे सर्व मिळून लाचलुचपत प्रतिबंध विभाग, वरळी, मुंबई येथुन सी लिंक मार्गे कलानगर जंक्शन येथुन एमएमआरडीए बीकेसी, बांद्रा पुर्व, मुंबई येथील प्रकाशगंगा कार्यालया समोरील वाहनतळाच्या ठिकाणी आडबाजुस येवुन थांबलो.

धर्मेश के. सोलंकी

श्री धर्मेश कांतीभाई सोलंकी यांची दि. ०२/०६/२०१८ रोजीची फिर्यादी जबाब पुढे चालु.

त्यानंतर पो.नि. पवार यांनी त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यांचेसोबत असलेले पो.शि. रावराणे यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजुस बनियनला लावला व पंचासह श्री पाटील साहेब यांना भेटण्यास पाठविले. त्याप्रमाणे मी पंच श्री. येडेकर यांचेसह श्री. पाटील साहेब यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली व माझ्या कामाबाबत त्यांच्या सोबत चर्चा केली. त्यावेळी श्री. पाटील साहेब यांनी माझ्याकडे काम करून देण्याकरीता रू. ४५,०००/— लाचेची मागणी केली असता त्यांना माझ्याकडे सद्या पैसे नसल्याचे सांगुन मी माझ्या नातलगांकडुन पैसे घेवुन येतो असे सांगुन मी पंचासह त्यांचे कार्यालयातून बाहेर पडून शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर थोडयावेळाने श्री. पाटील साहेब यांनी मला माझे मोबाईलवर संपर्क केला परंतु मी त्यांचा कॉल उचलण्यापूर्वी कट झाल्याने मी त्यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी मी श्री. पाटील साहेब यांचेशी चर्चा करुन माझेकडे सध्या रू. ४५,०००/— इतकी रक्कम नसल्याचे सांगून रु. ४०,०००/— देत असल्याबाबत त्यांना सांगितले असता, श्री. पाटील साहेब यांनी माझ्याकडे रू.४५,०००/— इतकीच रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांच्याविरूद्ध लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याबाबत पो.नि. पवार यांनी सांगितले.

त्यानंतर पो.नि.पवार यांचे सुचनेप्रमाणे फिर्यादी यांनी त्यांचे जवळील सर्व साहित्य शासकिय वाहनातील सिटवर काढून ठेवले. पो.नि.पवार यांनी सापळा कारवाईत वापरण्यात येणारी अॅन्थ्रासिन पावडरचा उपयोग, गुणधर्म याबाबत सविस्तर माहिती देवून त्याबाबतचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यानंतर फिर्यादी यांनी हजर केलेल्या लाचेच्या रू.५०० दराच्या ९० चलनी नोटांचे सिरीअल नंबर एका कोऱ्या कागदावर नोंद केले त्यानंतर पो.नि.पवार यांच्या सांगण्याप्रमाणे त्या चलनी नोटांना वाहन चालक शिवथरे यांनी अॅन्थ्रसिन पावडर लावली. सदर अॅन्थ्रसिन पावडर लावलेल्या नोटा शिवथरे यांनी फिर्यादी यांच्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या व वाहन चालक निघुन गेले.

त्यानंतर पो.नि. पवार यांनी मला, दोन्ही पंचाना व सोबतच्या स्टाफला सविस्तर सुचना दिल्या व पुन्हा माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन देवून पंच येडेकर यांच्यासह मला श्री. पाटील साहेब यांना लाचेची रक्कम रु.४५,०००/— देण्याकरीता पाठविले.

मी पंचासह श्री. पाटील साहेब यांच्या कार्यालयात गेलो असता पाटील साहेब यांच्या केबिनमध्ये गेलो त्यावेळी पंच केबिनच्या बाहेर थांबले होते. मी केबिनमध्ये गेल्यानंतर पाटील साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे लाचेची रक्कम रू.४५,०००/— आणले असल्याचे त्यांना सांगितले. त्यावर त्यांनी लाचेची रक्कम त्यांच्या टेबलाच्या उजव्या बाजुच्या पहिल्या कप्प्यात ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदरची लाचेची रक्कम टेबलच्या पहिल्या कप्प्यात ठेवली. त्यानंतर मी श्री. पाटील साहेब यांच्या केबिनच्या बाहेर येवुन सापळा पथकास पुर्व नियोजित ईशारा दिला. त्यानंतर सापळा पथकाने श्री. पाटील साहेब यांना पकडले.

धर्मेश के. सोलंकी

श्री धर्मेश कांतीभाई सोलंकी यांची दि. ०२/०६/२०१८ रोजीची फिर्यादी जबाब पुढे चालु.

माझे श्री पाटील यांचेशी कोणतेही पूर्व वैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत. लोकसेवक श्री. पाटील यांनी माझा प्रोफेशनल टॅक्स कमी करण्यासाठी माझेकडे रुपये रु.५०,०००/— इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती त्यांनी माझे कडुन रुपये रु.४५,०००/— लाचेची रक्कम स्विकारली आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कायदयानुसार कायदेशिर कारवाई होण्यासाठी फिर्याद आहे.

माझा वर नमूद जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत करण्यात आला असून तो मला वाचुन हिंदीतुन समजावून सांगितला तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(स्नेहल पवार)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई